महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/11/2022 (गुरूवार) दुपार

---

### खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. वेलतूर** :– दिनांक २९/११/२०१४ चे २०.०५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– पोलीस हवालदार बेनीशााम तालेवार, ब. न. १४२९ पोलीस स्टेशन वेलतूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अप. क्र. ४२/२०१४ कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २८/११/२०१४ चे १८.०० वा. सदर गुन्हयातील मृतक नामे– सौ. वंदना भगवान रघुर्ते, वय ३० वर्ष व नमुद आरोपी नामे– भगवान यशवंत रघुर्ते, वय ३९ वर्ष, रा. डोंगरगाव, ता. कुही आरोपी हे पति पत्नी असुन आरोपी हा दारू पिण्याचे सवयीचा असल्याने हा घटना वेळी व ठिकाणी मृतक ही आपले घरी हजर असतांना आरोपी घरी दारू पिवुन आल्याने आरोपीने शिवीगाळ करून हातबुक्क्याने मारहाण केली. तसेच मृतकाच्या अंगावर डबकीतील मातीचे तेल टाकुन माचिसचे काडीने आग लावुन पेटविले. उपचारा दरम्यान सदर मृतक मरण पावली.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. व्दारकानाथ गोंदके, पोस्टे वेलतूर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक १७/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. मा. आर. आर. भोसले यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व १५ हजार रू. दंड, दंड न भरल्यास ०९ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि/१२७२ अश्पाक शेख, पोस्टे वेलतूर यांनी मदत केली आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर वॉर्ड नंबर ३, पांडे लेआऊट नविन नांदा येथे दिनांक १५/११/२०२२ चे १९.०० वा. ते दिनांक १६/११/२०२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– अमित विजय प्रताप सिंग, वय ३० वर्ष, रा. वार्ड नंबर ०३, नविन नांदा, पांडे ले आउट यांचे नांदा व नागपूर येथे स्वत:चे घर असून नमूद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हा नांदा येथील घराला कुलूप लावून पत्नीसह नागपूरला राहण्यास गेला असता फिर्यादीचे सासरे यांनी फोन करून सांगितले की, ''नांदा येथील घराच्या समोरील दरवाजा खुला आहे.'' यावरून फिर्यादी हा नांदा येथे घरी गेला असता घराच्या समोरील दरवाजाचा कुलूप तुटलेला दिसला. फिर्यादीने आत जाऊन पाहिले असता बेडरूम मधील लाकडी अलमारीतुन १) ११ ग्रॅम सोन्याची चैन किंमती ४०,०००/– हजार रुपये २) रेडमी कंपनीचा मोबाईल जुना वापरता किमती १०००/– रुपये ३) एक चांदीची पायल किंमती १०००/– रुपये तसेच ४) बाजूचे स्टोररूम मधील सीसीटीव्हीचे डीवीआर मशीन किमती ३०००/– रुपये असा एकूण ४५,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने दरवाजाचा कुलूप तोडून आत प्रवेश करून चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर